# NIT DOCUMENT

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर,कर्मचारी**
**पुरविणे बाबतची निविदा.**

(दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२)

**सन २०२२ – २०२३**

**( एका वर्षा करीता )**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणे बाबतची निविदा.

सन २०२२ – २०२३

(एका वर्षा करीता)

## अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पान नंबर |
|---|---|---|
| १ | निविदा मागविण्याबाबतची नोटीस | १ |
| २ | निविदा धारकांची माहिती | २ ते ३ |
| ३ | निविदेच्या अटी शर्ती | ४ ते ९ |
| ४ | मनुष्यबळ संख्येचा तपशिल | १० ते ११ |
| ५ | तांत्रिक निविदा संबंधित सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे | १२ ते १३ |
| ६ | निविदाधारकाने दयावयाचे हमीपत्र | १४ ते १६ |
| ७ | व्यावसायिक बोली (Bill of Quantities) | १७ |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**पो.शिर्डी- ४२३ १०९, ता.राहाता जिल्हा-अहमदनगर**

फोन नं. (०२४२३) २५८८१० फॅक्स :- २५८८७०

( **Website** - www.shrisaibabasansthan.org.in / www.sai.org.in , **E-Mail** - labour@sai.org.in)

## ई- निविदा सूचना

| अ.नं. | ई- निविदेचा तपशील | निविदा किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | सन २०२२ – २३ (दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२) या कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल / कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबत. | १५,०००/- अक्षरी रु. पंधरा हजार मात्र | ३,००,०००/- अक्षरी रुपये तीन लाख मात्र |

१) ई-निविदेबाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) निविदेसंबंधी कागदपत्रे डाउनलोडींगसाठी दि.०२/१२ / २०२१ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन उपलब्ध आहे.
३) निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२३ /१२/२०२१ सायं.०५.०० वा.पर्यंत आहे.
४) निविदेबाबतची अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
५) तांत्रिक निविदा संबंधित सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशिल निवीदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑन लाईन अपलोड करावीत.
६) निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या पोर्टलवर जमा करण्यात यावी.
७) तांत्रिक निविदा दि.२७ /१२ /२०२१ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही अथवा सर्व निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबत कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणे बाबतची निविदा.**

**( एका वर्षा करीता )**

**निविदाधारकाची माहिती**

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| ०१ | निविदाधारकाचे नांव | |
| ०२ | पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता | |
| ०३ | दूरध्वनी क्रमांक | |
| ०४ | ऑफिस | |
| ०५ | फॅक्स नंबर | |
| ०६ | मोबाईल नंबर | |
| ०७ | ई.मेल | |
| ०८ | संपर्कासाठी प्रतिनीधीचे नांव | |
| ०९ | फोन नंबर / मोबाईल नंबर | |
| १० | मालकाचे / भागीदारांची नांवे | |
| ११ | ठेकेदारीचा नोंदणी क्र. (शॉप ॲक्ट / कंपनी ॲक्ट प्रमाणे) | |
| १२ | औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर | |
| १३ | सध्याचे लेबर लायसेन्स नंबर | |
| १४ | प्रॉव्हींडंड फंड कोड अकांऊंट नंबर | |
| १५ | ई.एस.आय.सी नंबर | |
| १६ | व्यवसाय कर नोंदणी नंबर | |
| १७ | कर्मचाऱ्यांची एकुण संख्या | |

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १८ | आयकर पॅन नंबर | |
| १९ | सेंट्रल GST रजिस्ट्रेशन नंबर | |
| २० | स्टेट GST रजिस्ट्रेशन नंबर | |
| २१ | बॅंकेचे नाव, शाखा<br>बॅंक खाते नंबर | |
| २२ | आय.एफ.सी कोड | |
| २३ | आर्थिक वर्ष सन २०१७-१८,२०१८-१९, २०१९-२० चे बॅलन्ससीट. | |
| २४ | वार्षिक उलाढाल २०१७-१८,२०१८-१९ ,२०१९-२० चार्टर्ड अकौंट सर्टिफिकेट | |
| २५ | २०१७-१८,२०१८-१९, २०१९-२० चे आयकर रिटर्न दाखल केले संबंधीचे पुरावे. | |

**निविधाधारकाची स्वाक्षरी व शिक्का**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबत

## ई - निविदेच्या शर्ती व अटी

१) कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबतची निविदा www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन भरावयाची असून, **ऑनलाईन भरलेल्या Technical Bid व Commercial Bid हयाच ग्राहय धरण्यात येईल.**

२) निविदा ऑनलाईन भरावयाची असल्याने Technical Bid सर्व कागदपत्रे ऑनलाईनच अपलोड करावीत.

३) Technical Bid चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

४) **निविदा पुर्व अर्हता:-**

पुढील प्रमाणे अर्हता धारण करणा-या निविदा धारकांनाच प्रस्तुत निविदेसाठी पात्र समजण्यात येईल.

अ) मागील ३ वर्षात विविध आस्थापनांला प्रतीवर्षी सरासरी किमान १००० कामगार पुरविण्याचा अनुभव असावा.

ब) मागील ३ वर्षात कोणतेही एका आस्थापनेला दररोज ५०० कामगार पुरविणेचा कमीत कमी १ कार्यादेश असावा.

क) मागील ३ वर्षात (सन- २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०) आर्थीक वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.१० कोटी इतकी असावी.

५) **निविदेचे मुल्यांकन:-**

**अ) तांत्रीक मुल्यांकन** – प्राप्त निविदा धारकांच्या पुढील मुल्यांकन पध्दतीप्रमाणे गुणांकन करण्यात येईल.

मागील ३ वर्षात प्रतिवर्षी सरासरी पुरविलेल्या कामगारांची संख्या:-

०१)

| अ.नं. | कामगार संख्या | गुण (मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १००० ते १२०० | १० |
| २ | १२०० ते १५०० | २० |
| ३ | १५०० ते २००० | ३० |
| ४ | २००० पेक्षा जास्त | ४० |

५०० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी एका आस्थापनेला पुरविलेल्या कार्यादेशांची संख्या:–

०२)

| अ.नं. | आस्थापनेवरील कार्यादेशांची संख्या | गुण (मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १ पेक्षा जास्त ३ पर्यंत | २० |
| २ | ३ पेक्षा अधिक | ३० |

मागील ३ वर्षातील वार्षिक सरासरी उलाढाल

०३)

| अ.नं. | वार्षिक उलाढाल | गुण (मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १० ते १२ कोटी | १० |
| २ | १२ कोटी पेक्षा जास्त ते १५ कोटी | २० |
| ३ | १५ पेक्षा जास्त कोटी | ३० |

उपरोक्त मुल्यांकन पध्दतीप्रमाणे किमान ७० गुण मिळालेल्या निविदा धारकांच्याच वाणिज्यीक निविदा उघडण्याला पात्र असतील.

ब) **वाणिज्यिक मुल्यांकन:-** तांत्रिक मुल्यांकनात किमान ७० गुण मिळालेल्या निविदा धारकांची वाणिज्यीक निविदा उघडण्यात येवून त्यामध्ये न्युन्नतम दरधारक निविदाधारकास यशस्वी निविदा धारक समजण्यात येईल.

६) निविदाधारक / कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमू इच्छिणारे कंत्राटी कामगार हे भाविक प्रवृत्तीचे असले पाहीजेत. तसेच संस्थानमध्ये दर्शनासाठी येणा-या भाविकांशी नम्रतेने व तत्परतेने सेवा देणारे असावेत. भाविकांशी उध्दट, बेशिस्त वर्तन तसेच इतर गैरशिस्तवर्तन करणारे कंत्राटी कामगारांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरुन बंद करणेची जबाबदारी संबधीत कंत्राटदारावर राहील.

७) कंत्राटदाराने त्यांचेमार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांवर नियंत्रण (कंन्ट्रोल) व देखरेख (सुपरविझन) ठेवणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी कामगार व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबध राहणार नाही अथवा प्रस्थापित होणार नाही. त्याबाबत काही विवाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची/ठेकेदाराची राहील.

८) कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी कामगार यांनी संस्थानच्या आवारात कोणतेही स्वरुपाचे गैरवर्तन केले अथवा शिस्तीस बाधा येईल असे कोणतेही वर्तन केल्यास, असे गैरवर्तन केलेले कामगार कंत्राटदाराने संस्थानला पुरवू नये.तसेच असे प्रकार वारंवार घडल्यास विना नुकसान भरपाई व विना नोटीस संबंधीत कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याचा हक्क संस्थान प्रशासन राखून ठेवत आहे.

९) कंत्राटदारामार्फत पुरविलेले कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्य केल्यास किंवा संस्थानचे मिळकतीस इजा/हानी पोहोचविल्यास त्याबाबतची संपूर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांचेवर राहील.

१०) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांची निवासाची व्यवस्था संबधीत कंत्राटदारास स्वत: करावी लागेल. कंत्राटी कामगारांची निवासव्यवस्था करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

११) संस्थानला आवश्यकतेप्रमाणे व गरजेप्रमाणे पुरेसे संख्येने अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे संबंधीत निविदाधारकावर बंधनकारक आहे. प्रशासनाचे आवश्यकतेनुसार श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री दसरा उत्सव, शिर्डी महोत्सव , आपत्ती काळात व सुट्टयांचे कालावधीत तात्पुरते जादा कंत्राटी कामगारांची मागणी केल्यास ते पुरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. निविदाधारकाने वर्क ऑर्डरप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे संस्थान प्रशासनाला कंत्राटी कर्मचारी पुरेसे संख्येने न पुरविल्यास, त्याप्रमाणात प्रतिदिनी प्रति कमी पुरविलेले कर्मचारी रूपये ५००/-प्रमाणे दंड कंत्राटी कामाचे बिलातुन वसुल/कपात करणेत येईल.

१२) कंत्राटदाराने निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी त्यांचेमार्फत पुरविलेल्या अकुशल, कुशल कामगारांची संपूर्ण नांवे, पत्ते व त्यांचे जन्मतारीख दाखले, दोन पासपोर्ट साईज फोटो संस्थानला देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सर्व कंत्राटी कामगारांचा पोलीस तपासणी अहवाल कार्यादेश मिळालेपासून ४५ दिवसांचे आत संस्थानला सादर न केल्यास प्रतिदिनी रूपये ५००/- दंड मासिक बिलातुन कपात/वसुल करणेत येईल.

१३) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांना युनिफॉर्म, ओळखपत्र, डयुटी कार्ड कार्यारंभ आदेश मिळालेपासून १ महिन्याचे आत पुरविणेची जबाबदारी संबधीत कंत्राटदारावर राहील व त्या कामी येणारा खर्च कंत्राटदारास स्वत: करावा लागेल. तसे न केल्यास प्रतिदिनी रूपये १०००/- दंड मासिक बिलातुन कपात/वसुल करणेत येईल.

१४) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडुन युनिफॉर्म, ओळखपत्र, ड्यूटी कार्डबाबत रक्कम कंत्राटदारास वसुल/कपात करता येणार नाही.

१५) कंत्राटदार व त्यांचेमार्फत पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगार यांच्यात काही विवाद अथवा तंटा उपस्थित झाल्यास तो सोडविण्याची पुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याची तोषीस अथवा झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही याची खबरदारी घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

१६) मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निश्चीत केलेल्या वेतन व इतर दरामध्ये कोणत्याही सबबीवर कंत्राटदारास अथवा त्याने पुरविलेल्या कंत्राटी कामगारास दरवाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. वेतन दराबाबत अथवा इतर कायदेशीर देणी देणेबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत निविदाधारक / ठेकेदारावर राहील.

१७) निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कर्मचा-यास कामगार नुकसान भरपाई (वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट, १९२३) कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी निविदाधारकांवर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲक्टचे तरतुदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची रु.१० लाख रक्कमेची विमा पॉलीसी कार्यारंभ मिळालेपासून १ महिन्यांचे आत घेणे व सदर विमा पॉलीसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे संबंधीत कंत्राटदारावर बंधनकारक राहील. दरम्यानचे काळात कामगारांसंदर्भात काही दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी किंवा नुकसान भरपाईची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहिल.

१८) एम्प्लॉईज प्रॉव्हीडंट फंड ॲन्ड मिसलिनियस प्रोव्हीजन ॲक्ट, १९५२ नुसार कंत्राटदाराकडे भविष्यनिर्वाह निधीचा महाराष्ट्रातील रिजनल प्रॉव्हीडंट फंड कमिशनर ऑफिस, अथवा नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील स्वतंत्र प्रॉव्हीडंट फंड कोड नंबर असणे आवश्यक आहे. भविष्य निर्वाहनिधीचा स्वतंत्र कोड नंबर संबंधीत ॲथॉरिटीकडून घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर नसलेल्या ठेकेदाराची/कंत्राटदाराची निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदेसोबत प्रॉव्हिडंट फंड कोड ड्राफ्ट नंबरची प्रत सादर करणेत यावी.

१९) कंत्राटी कर्मचारी हिस्सा प्राव्हींडंड फंड १२ % व मालकाचा हिस्सा १३ % (प्रशासकीय चार्जेससह) अशा एकूण २५% प्रा.फंडांच्या रकमेचा भरणा ठेकेदाराने स्वतः करावयाचा आहे. व त्याबाबतची चलने व इतर अनुषंगिक कागदपत्रे संस्थानच्या प्रशासन शाखा वशी १० अ यांचेकडे विहित मुदतीत जमा करावयाची आहे. त्यानंतरच सदर १३% मालकाचा हिस्सा ठेकेदारास / मासिक बिलामध्ये संस्थानकडून अदा करण्यात येईल.कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रॉव्हीडंट फंड रक्कमेचा भरणा विहीत मुदतीत करणे व प्रॉव्हीडंट फंड चलने व अनुशंगिक कागदपत्रे विहीत मुदतीत सादर करणे हे तुमचेवर नियमानुसार बंधनकारक राहील. त्याची तोषीस/झळ संस्थानला लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विलंबाबाबत दंडात्मक अथवा इतर कारवाई झाल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर राहील.

२०) मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ चे कलम ६ (ब) ब नुसार प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे माहे जून व माहे डिसेंबर या महिन्याचे कंत्राटी कामगारांचे पगार पत्रकातुन सर्व कंत्राटी कामगारांची नियमानुसार विहित दराने वेलफेअर फंडाची वर्गणी (कामगार हिस्सा) कपात करुन, तसेच मालकाच्या हिश्श्याची वेलफेअर फंडाची वर्गणी कंत्राटदाराने स्वत: जमा करावयाची आहे व अशा कामगार तसेच मालक वर्गणीच्या एकत्रीत रक्कमेचा भरणा प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे १५ जुलै व १५ जानेवारी पुर्वी चेक/डिमांड ड्राफ्टद्वारे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेणू मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग,एलफिन्स्टन, मुंबई- ४०० ०१३ यांचेकडे विहित विवरणत्रासोबत कंत्राटदाराने करावयाचा आहे. सदर कामगार कल्याण निधी भरणा करणेची कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कल्याण निधी वर्गणी संदर्भात कुठलीही रक्कम कंत्राटदारास संस्थानकडून दिली जाणार नाही.

२१) कंत्राटदाराने महीना भरल्यानंतर पुढील महीन्याच्या तीन तारखेपर्यंत त्यांचे कामाचे बिल हजेरीपटासह संस्थानचे संबधीत अधिक्षक/खातेप्रमुख त्यांचेमार्फत कामगार विभागाकडुन तपासुन/पडताळणी करून लेखाशाखेकडे यांचेकडे दाखल करणे आवश्यक आहे.

२२) लेखाशाखेकडुन सदर बिलाची रितसर तपासणी / पडताळणी केल्यानंतर बिलाची मंजूर रक्कम कंत्राटदारास आदा केली जाईल.

२३) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे वेतन महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आंत विहीत वेळेत संबंधित कंत्राटी कर्मचा-यांचे बॅंक अकाऊंट वर्ग करणे कंत्राटदारावर नियमाप्रमाणे बंधनकारक राहील. संस्थानकडुन काही कारणास्तव बिलाची रक्कम ठेकेदारास आदा करणेस विलंब झाल्यासही देखील कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांचे पेमेंट वाटप स्व:भांडवलातून विहीत मुदतीत म्हणजे महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत न केल्यास, ११ तारखेपासून ते पेमेंट वाटप होईपर्यंत प्रत्येक दिवसाला रूपये ५,०००/- याप्रमाणे दंड कंत्राटदाराचे मासीक बिलातुन वसुल/कपात करणेत येईल.

२४) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक व इतर आवश्यक ते रेकार्ड कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टप्रमाणे ठेकेदारास विहीत नमुन्यात ठेवावे लागेल.ते कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कंत्राटी कामगारांचे वेतनाबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२५) **अ)** कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगारांचे, कामगार कल्याण निधी, व्यवसायकर, आयकर, टी.डी.एस., इन्क्रीमेंट, वर्कमेन कॉम्पेनसेशन, घरभाडे भत्ता, पगारी सुट्ट्या, पगारी रजा, ई.एस.आय.सी. कॉन्ट्रीब्युशन, उपदान (ग्रॅच्युइटी) ,जी.एस.टी व इतर आर्थिक बाबी, अपघाती जीवीत इ. संबंधीची सर्व कायदेशीर जबाबदारी औद्योगिक व कामगार कायदयाचे तरतुदीनुसार कंत्राटदारावर राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार रहाणार नाही अथवा त्याची तोषीस व झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

**ब)** वरील सर्व कायदेशीर जबाबदारी गृहीत धरुन, कंत्राटदाराने व्यावसायिक निविदेमध्ये ( Financial Bid मध्ये ) सेवा दर (Service Charges) संस्थानकडून देण्यात येणा-या वेतन दरावर नमूद करावयाचे आहे.

**क)** कंत्राटदारामार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ (मुंबई, सिकंदराबाद, बैगलोर व चेन्नई कार्यालयासाठी झोन नं.०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, तसेच संस्थानचे हॉस्पीटलमधील वैद्यकीय व इतर पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा / वाटाघाटीत ठरलेप्रमाणे सध्या देय्य असलेले वेतनदर (महाराष्ट्र शासनाकडुन वेळोवेळी देय्य होणारे स्पेशल अलौन्ससह) अधिक प्रॉव्हीडंट फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा- १३.००%) अधिक कंत्राटी कर्मचाऱ्याचे वेतनदराचे रक्कमेवर सर्व्हिस चार्जेस रक्कम अधिक संपुर्ण बिलाचे रक्कमेवर अनुज्ञेय GST अधिक सानुग्रह अनुदान- ८.३३% (प्रत्येक वर्षी दिपावली सणाचे वेळी), अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरंन्स प्रिमियम (अंशदान) याप्रमाणे रक्कम संबंधीत ठेकेदारास संस्थानकडुन देणेत येईल. याव्यतिरिक्त कोणतीही रक्कम संस्थानकडुन ठेकेदारास आदा केली जाणार नाही व तशी रक्कम मागणी करणेचा ठेकेदारास अधिकार राहणार नाही. इतर सर्व प्रकारची आर्थिक देणी देणेची जबाबदारी सबंधीत ठेकेदारावर राहील. त्याबाबत ठेकेदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२६) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी कामगारांसबंधी कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० व महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम १९७१, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, किमान वेतन अधिनियम १९४८, व इतर सर्व औद्योगिक तसेच कामगार कायदयांच्या तरतुदींचे पालन करण्याची व त्यानुसार विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्ट्या आवश्यक ते सर्व रेकॉर्ड, दस्तऐवज ठेवण्याची व संबधीत ॲथॉरिटीला विवरण पत्रे पाठविण्याची, त्याबाबत वेळोवेळी कायदेशीर पुर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी कामगारांचे संदर्भात ठेवावयाचे सर्व प्रकारचे रेकॉर्ड्स, दस्तऐवज उदा.कंत्राटी कामगारांची प्रत्येक महिन्यांची बिले, हजेरी रजिस्टर, पगारपत्रके, यादया, विवरणपत्रे, प्रॉव्हीडंड फंड, सर्व्हिस टॅक्स, कामगार कल्याण निधी इत्यादि संदर्भातील सर्व कागदपत्रे व दस्तऐवज विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्ट्या अचुक व परिपुर्ण ठेवण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

२८) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कामगारांचे दैनंदिन आगमन व निर्गमनावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वखर्चाने स्वतंत्र बायोमेट्रीक्स ॲटेंडन्स सिस्टीम बसविणे बंधनकारक राहील. तसेच संबधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा पेमेंट स्लिप द्यावी लागेल. हे संबधीत कंत्राटदारकावर बंधनकारक राहील.

२९) संबंधित कामाची निविदा शुल्क रु.१५,००० (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) व बयाणा रक्कम म्हणून रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) www.mahatenders.gov.in या ऑनलाईन टेंडर पोर्टल वरील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे भरावी.

३०) निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी निविदाधारकास कामाची हमी म्हणून एकूण अंदाजित वार्षिक बिलाच्या रक्कमेच्या ३ % सुरक्षा अनामत रक्कम रु.१,२०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लाख मात्र) मात्र त्वरीत रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने संस्थानकडे बिनव्याजी जमा करावी लागेल.कंत्राट पूर्ण झालेनंतर सदर रक्कम कंत्राटदारास बिनव्याजी परत करणेत येईल. सन २०२०-२१ चे सदर कामाचे वार्षिक बील रु.३२,०३,८१,१७८/- इतके होते. सन २०२२-२३ करीता अंदाजित खर्च रु.४० कोटी.

३१) निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १० दिवसांचे आंत सदर कंत्राटदाराने रितसर लेखी करारनामा रु.६०० चे स्टॅम्प पेपरवर करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील व कायद्यानुसार आवश्यक असलेले रजिस्ट्रेशन, प्रॉव्हीडंट फंड नंबर, लेबर लायसेन्स, सिक्युरिटी डिपॉझिट इत्यादी सर्व बाबींची कायदेशीर पुर्तता कंत्राटदारास ०१ महिन्याचे आत करावी लागेल. सदर पुर्तता विहीत मुदतीत न केल्यास त्या पुढील तारखेपासून प्रतिदिनी रु.५००/- मात्र दंडाची रक्कम ठेकेदाराचे मागील बिलातुन कपात / वसुल करणेत येईल.

३२) निविदा मंजूर झालेनंतर कार्यदेश प्राप्त होताच वर नमूद केलेप्रमाणे स्टॅम्प पेपरवर करारनामा सांक्षाकित करुन देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील तसेच या निविदेतील अटी व शर्ती, मा.व्यवस्थापन समिती ठराव, कार्यादेश इत्यादि करारनाम्याचा एक भाग समजला जाईल.

३३) संस्थानला सदर कंत्राटदाराची आवश्यकता न वाटल्यास अथवा कंत्राटदाराचे काम समाधानकारक न वाटल्यास सदरचा करार अथवा कंत्राट मुदतपुर्व विना नोटीस व विना नुकसान भरपाई रद्द करण्याचा हक्क प्रशासनाने राखून ठेवला आहे.

३४) निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटदाराने काम करण्याचे नाकारल्यास कंत्राटदाराची बयाणा रककम तसेच अनामत रक्कम जप्त करणेत येईल व कंत्राट विनानोटीस किंवा विना नुकसान भरपाई रद्द करणेत येईल. त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ०३ वर्षासाठी Black list केले जाईल.

३५) परिशिष्ट - २ मध्ये नमूद केलेप्रमाणे तांत्रिक कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावेत.

३६) सदरचे कंत्राट हे कार्यारंभ दिल्यापासून १२ महीने (एक वर्ष) कालावधीसाठी वैध राहील व तदनंतर संस्थान प्रशासनाच्या आवश्यकते व गरजेनुसार आहे त्याच अटी, शर्ती तसेच दरपत्रकास अनुसरुन सदर कराराची/कॉन्ट्रॅक्टची मुदत पुढे वाढविली जाईल. तसे कंत्राटदारास लेखी पत्रान्वये कळविणेत येईल. अथवा सदर करारनामा/कॉन्ट्रॅक्ट मुदत संपताच आपोआप संपुष्टात येईल.

३७) कोणतीही निविदा निविदाप्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

३८) निविदाधारकाने ई-निविदा भरतांना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास /राहील्यास त्या निविदा कोणतेही कारण न देता रद्द अथवा अपात्र समजण्यात येतील. त्याबाबतचा अंतिम निर्णय हा संस्थान प्रशासनाने राखुन ठेवला आहे.

३९) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त निविदाधारकास कार्यादेश देऊ शकते.

४०) ऑनलाईन निविदा सादर करतांना व्यवसायिक निविदेमध्ये ( Financial Bid ) तक्त्यामध्ये वेतनदर , प्राव्हीडंन्ड फंड, सानुग्रह अनुदान,सेवा कर अथवा जी एस टी व तसेच गृप इन्सुरन्स इत्यादी बाबी वगळून निवीदा फॉर्ममधील अटी शर्तीचे अ.नं.२५ (अ) मध्ये नमुद केलेल्या कंत्राटदारावरील सर्व कायदेशीर आर्थिक देणी (बाबी) व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, निविदाधारकांनी फायनन्सशियल बीडमध्ये सर्व्हिस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी. ऑन-लाईन भरलेली व्यावसायीक बोली (Commercial Bid) ग्राहय धरण्यात येईल.

४१) निविदेत नमूद केलेले काम गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येणार आहे. त्यासाठी निविदाधारकांनी पा.नं. १२ मध्ये दर्शविलेली कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

४२) या कॉन्ट्रॅक्टबाबत काही वाद अथवा तंटा उत्पन्न झाल्यास तो मा.सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन, राहाता/मा.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन, कोपरगाव / मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

४३) निविदेमधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करुन निविदा सादर करावी व निविदेचा भाग म्हणून निविदेतील प्रत्येक पानांवर नमुद केलेल्या अटीशर्ती मान्य असलेबाबत प्रत्येक पान सहीशिक्यानिशी साक्षांकींत करुन अपलोड करणेत यावे.

४४) उपरोक्त अटी व शर्तींमध्ये उल्लेख नसलेल्या इतर बाबींतील सर्व हक्क प्रशासनाने राखून ठेवलेले आहेत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# परिशिष्ट – १

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा – अहमदनगर पिन- ४२३ १०९.

## मनुष्यबळ संख्या तपशिल

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने स्वच्छता, बगीचा व इतर कामासाठी अकुशल कामगार, कुशल कर्मचारी पुरविणेबाबत सर्व साधारण माहिती खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना स्वच्छता, बगीचा व इतर कामासाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कर्मचारी पुरविण्यासाठी अनुभवी, नोंदणीकृत व परवानाधारक कंत्राटदारांकडून ई – निविदेव्दारे निविदा मागविण्यात येत आहेत. संस्थानला दैनंदिन कामासाठी कंत्राटीपध्दतीने खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांमार्फत आवश्यकतेप्रमाणे पुरवावयाचे आहेत.

**अ)कुशल कामगार: ६२९**

**** वर्गवारी ****

| अ.नं. | कुशल वर्गवारी | संख्या |
|---|---|---|
| १ | इलेक्ट्रीशियन | १३ |
| २ | वेल्डर | ०९ |
| ३ | फिटर (प्रसादालय) | ३ |
| ४ | मेंन्टेनन्स इंजिनिअर (प्रसादालय) | १ |
| ५ | वाहन चालक | ६८ |
| ६ | ॲटो इलेक्ट्रीशियन (वाहन) | ३ |
| ७ | फिटर/मॅकेनिक (वाहन) | २ |
| ८ | सिव्हील सुपरवायझर | १ |
| ९ | सुतार | ३ |
| १० | गवंडी | ४ |
| ११ | आर ॲण्ड ए सी मेकॅनिक | ७ |
| १२ | टेलीफोन ऑपरेटर | ६ |
| १३ | टर्नर | २ |
| १४ | प्लंबर | २ |
| १५ | आर ओ प्लॉन्ट ऑपरेटर | २ |
| १६ | केमिस्ट (पाणिपुरवठा) | २ |
| १७ | लिपीक (सर्व विभाग) | १९१ |
| १८ | सीसीटीव्ही ऑपरेटर | २ |
| १९ | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ |
| २० | कॉम्प्युटर प्रोग्रॅमर | १ |
| २१ | कॉम्प्युटर मेटेंनन्स | २ |
| २२ | आरेखक | १ |
| २३ | आर.एम.ओ./बी.ए.एम.एस. | २० |
| २४ | लिनन | १ |
| २५ | लॅब टेक्नीशियन | १७ |
| २६ | परिचारीका | १७७ |
| २७ | फार्मासिस्ट | १० |
| २८ | एक्स-रे टेक्नीशियन | २ |
| २९ | डायलेसिस टेक्निशियन | ३ |
| ३० | बायोमेडीकल टेक्नीशियन | ४ |
| ३१ | डेंन्टल टेक्नीशियन | १ |
| ३२ | एम.आर.आय.टेक्नीशियन | २ |
| ३३ | सिटी स्कॅन टेक्नीशियन | २ |
| ३४ | टेलरींग असिस्टंट | १ |
| ३५ | फिजोओथेरपिस्ट | २ |
| ३६ | ज्यु.बायोमेडीकल इंजीनिअर | २ |
| ३७ | ई.सी.जी. टेक्नीशियन | १ |
| ३८ | परफ्युजनिस्ट | २ |
| ३९ | कॉम्प्युटर शिक्षक | १ |
| ४० | बालवाडी शिक्षीका (इंग्लीश) | ५ |
| ४१ | शिक्षीक (इंग्लीश/क.शाळा/ज्यु.कॉलेज) | ४० |
| ४२ | लॅब असिस्टंट (कन्याशाळा) | १ |
| ४३ | पर्यावरण शास्त्र शिक्षक | १ |
| ४४ | सहाय्यक पुजारी | ७ |

**ब)** स्वच्छता कामासाठी अंदाजे अकुशल कामगार :- ७४

**क)** बगीचा, मालवाहतुक, मालभरणे, खाली करणे व इतर कामासाठी अकुशल कामगार :- ६४८

**ड) अंदाजे एकुण- (अ + ब + क) (६२९ + ७४ + ६४८ ) :- १३५१**

आवश्यकतेनुसार उपरोक्त संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे कंत्राटदारास कंत्राटी कामगार पुरवावे लागतील.

१) ई - निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख२३ /१२ /२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर आलेली ई - निविदा स्वीकारली जाणार नाही.

२) अपूर्ण अथवा बयाणा रक्कम नसलेली, तसेच आवश्यक कागदपत्रे जोडली नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

३) मुदतीनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

४) उपरोक्त अटी शर्तीमध्ये अंशता: किंवा पुर्णत: बदल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवला आहे.

(भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# परिशिष्ट – २

**तांत्रिक निविदा (Technical Bid) आवश्यक कागदपत्रे.**

**१) खालील तपशील प्रमाणे तांत्रिक कागदपत्राची (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करुन Soft Copy सादर करावी. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.**

**अ) कागदपत्रे**

१. मागील तीन वर्षातील वर्कऑर्डर / करारनामे (कर्मचारी संख्येसह).

२. सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडील मागील तीन वर्षातील लेबर लायसेन्सच्या वर्षनिहाय प्रती.

३. मागील ३ वर्षात विविध आस्थापनांना आस्थापना निहाय पुरविणेत आलेल्या कामगारांची संख्या दर्शविणारा स्वसाक्षांकित तक्ताः-

**अ)आर्थिक वर्ष २०१८-१९** (दि.०१ एप्रिल २०१८ ते दि.३१ मार्च २०१९)

| अ.नं.<br>१ | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव<br>२ | आदेश क्रमांक व दिनांक<br>३ | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या<br>४ |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**ब)आर्थिक वर्ष २०१९-२०** (दि.०१ एप्रिल २०१९ ते दि.३१ मार्च २०२०)

| अ.नं.<br>१ | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव<br>२ | आदेश क्रमांक व दिनांक<br>३ | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या<br>४ |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**क)आर्थिक वर्ष २०२०-२१** (दि.०१ एप्रिल २०२० ते दि.३१ मार्च २०२१)

| अ.नं.<br>१ | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव<br>२ | आदेश क्रमांक व दिनांक<br>३ | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या<br>४ |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

ड)मागील ३ वर्षात सरासरी पुरविलेल्या कामगारांची संख्या

| अ.नं.<br>१ | आर्थिक वर्ष<br>२ | आस्थापनेचे नाव<br>३ | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या<br>४ |
|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | | |
| २ | २०१९-२० | | |
| ३ | २०२०-२१ | | |

ब) कागदपत्रे

| अ.नं. | निविदेसोबत सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | संस्था नोंदणीकृत असलेबाबत सक्षम प्राधीका-याने दिलेले प्रमाणपत्र. |
| २ | निविदाधारकाचे मागील तीन वर्षाचे उलाढालीबाबत चार्टर्ड अकौन्टंट (CA) यांचे प्रमाणपत्र.(२०१७ ते २०१८, २०१८ ते २०१९ व २०१९ ते २०२०) |
| ३ | २०१७ ते २०१८, २०१८ ते २०१९ व २०१९ ते २०२० चे इन्कम टॅक्स रिटर्न. |
| ४ | आयकर पॅन कार्डची सत्यप्रत. |
| ५ | कामगार आयुक्त कार्यालयाकडील मागील ३ वर्षातील सर्व कामांचे लेबर लायसेन्सची सत्यप्रत. |
| ६ | PF Code Accounts Number रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| ७ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| ८ | GST रजिष्ट्रेशनची सत्यप्रत. |
| ९ | बँक अकौन्ट खाते पास बुकची सत्यप्रत. |

सदर तांत्रिक निविदेत पात्र ठरणा-या निविदा धारकांचे मुल्यांकन पान नं.०४ वरील मुद्दा क्र. ५ प्रमाणे केले जाईल.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

# व्यावसायीक निविदा

दिनांक: - / /२०२१

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर

**विषय:- कंत्राटी पध्दतीने कुशल व अकुशल, स्वच्छता कर्मचारी व इतर कर्मचारी पुरविणेबाबतची ई- निविदा.**

संदर्भ:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील जाहिरात दैनिक ------------दि. / /२०२१.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीस अनुसरुन व निविदाबाबतच्या अटी-शर्ती पुर्ण वाचून, समजून घेऊन मी खालील सही करणार पुढीलप्रमाणे ई-निविदा सादर करीत आहे.

**१) निविदाधारकाचे/ठेकेदाराचे** ------------------------------------------------------------------------

**संपूर्ण नांव व पत्ता** : ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) **फोन/मोबाईल नंबर** :

**ई-मेल** :

३) **कंत्राटदाराचे स्वरुप** :
(भागीदारी/प्रा.लि/पब्लीक लि.इ.)
भागीदारी असल्यास पार्टनरशीप डीड
ची प्रत, रजिस्ट्रेशन सर्टीफिकीट इ.
तांत्रिक निविदे सोबत जोडावी.

**४) सध्या एजन्सीकडे पे रोलवर असलेल्या**
**कर्मचारी संख्येचा तपशील खालील प्रमाणे** :
अकुशल व कुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या :

५) सध्या कोणकोणत्या ठिकाणी लेबर व इतर
कामगार पुरवितात त्या संस्थेची
नांव, पत्ता, फोन नंबर सह यादी व संस्था निहाय कर्मचारी संख्येचा तपशिल
(सोबत नेमणूक पत्रांची सत्यप्रत व यादी जोडावी)

**६)कंत्राटी कामाचा पुर्वानुभव = एकुण वर्षे**

**७)निविदाधारकाची वार्षीक उलाढाल- रुपये**
**(सन- २०१९ - २०२० कालावधीतील)**
(निविदेसोबत चार्टर्ड अकौटंटचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी. त्याशिवाय निविदा विचारात घेतली जाणार नाही.)

८) (अ) सध्याचे अकुशल कामगाराचे प्रतिदिनी वेतन दर (किमान वेतन दराप्रमाणे)

| अ.नं. | तपशील | मुळवेतन | स्पेशल अलाऊन्स | एकूण किमान वेतन दर (प्रतिदिन) |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छता कामासाठी(किमान वेतनदराप्रमाणे) | ३३९.५४ | ५५.०० | ३९४.५४ |
| २ | बगीचा, मालवाहतुक, मालभरणे, खाली करणे | ३३९.५४ | ५५.०० | ३९४.५४ |
| ३ | इतर कामासाठी | ३३९.५४ | ५५.०० | ३९४.५४ |
| ४ | अकुशल कामासाठी (मुंबई कार्या.झोन नं.१) | ३८५.४२ | ५५.०० | ४४०.४२ |

(ब) सध्याचे कुशल कामगारांचे प्रतिदिनी वेतन दर (किमान वेतनदराप्रमाणे)

| अ.नं. | तपशील | मुळवेतन | स्पेशल अलाऊन्स | एकूण किमान वेतन दर (प्रतिदिन) |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामासाठी | ४०१.५४ | ५५.०० | ४५६.५४ |
| २ | कुशल कामासाठी (मुंबई कार्या.झोन नं.१) | ४४७.३८ | ५५.०० | ५०२.३८ |
| | दरमहा एकत्रित वेतनावरील कर्मचारी | | | |
| ३ | परफ्युजनिस्ट (पॅरामेडीकल कामासाठी) | - | - | ३२,७४३ |
| ४ | वैद्यकिय कामासाठी [ B.A.M.S.] | - | - | १६,२०० |

**टिप-** संस्थान आस्थापनेस शॉप्स ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लिसमेन्ट (झोन) परिमंडल नं.३ मुंबई व सिंकदराबाद, चेन्नई व बैंगलोर करीता परिमंडल नं.१ नुसार किमान वेतनदर लागु आहेत. सध्याचे वेतनदर अथवा किमान वेतनदरापेक्षा कमी दरांचा विचार केला.

जाणार नाही. वरील दरांमध्ये प्राव्हीडंन्ड फंड, जी.एस.टी सानुग्रह अनुदान, ग्रुप इन्सुरंन्स इत्यादी बाबींचा समावेश करणेत आलेला नाही. वरील प्रमाणे रक्कम संस्थानकडून संबधीत कंत्राटदारास कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणेकामी देणेत येईल.

९) **अ) प्रॉव्हीडंट फंड प्रशासकीय चार्जेससह** : मागणी- १३.०० %
(मालकाचा हिस्सा) (१३.००%)

**ब) CGST – ९ % व SGST – ९ %** : अशी एकूण GST = १८ %

**क) सानुग्रह अनुदान (८.३३ %)** : मागणी- ८.३३ %

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे रक्कम संस्थानकडून कंत्राटदारास देणेत येईल. निविदेचा भाग म्हणून निविदेतील प्रत्येक पानांवर नमूद केलेल्या अटी शर्ती मान्य असलेबाबत प्रत्येक पान सहीशिक्यानिशी स्वःसाक्षांकीत करून द्यावेत.

## -- हमीपत्र --

मी / आम्ही निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्यानुसार आमचेवर येणाऱ्या सर्व कायदेशीर आर्थिक जबाबदाऱ्या विचारात घेऊन, आमचेमार्फत सदर व्यवसायीक निविदा सादर करण्यात येत आहे.

खालील सही करणार मी / आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण संस्थानचे संकेतस्थळ व महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली ई-निविदा वाचली. आपल्या ई-निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून मला / आम्हाला मान्य आहेत. आपले अटी शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहेत.

मी / आम्ही आपणास ई-निविदेमध्ये नमूद केलेली अकुशल,कुशल व इतर कर्मचारी संख्या व वेळोवेळी मागणी प्रमाणे कर्मचारी संख्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने पुरविणे बाबतची हमी देतो. अटी व शर्तीनुसार कर्मचारी पुरविण्याची कामे नेमून दिल्याप्रमाणे व्यवस्थित करुन दिले जाईल.त्यात कुठलेही प्रकारची फसवणूक व हलगर्जीपणा करणार नाही. तसेच संस्थानचे मागणी नुसार कोणत्याही वेळेस कर्मचारी पुरविणे बाबतची पुर्तता करुण देण्याची हमी आम्ही देत आहे / आहोत.

कार्यादेश प्राप्त झालेनंतर कामाची हमी म्हणुन एकूण रु.१,२०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लाख मात्र) सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसाचे आत मी / आम्ही संस्थानचे लेखाशाखा विभागात रोख भरणा करणेची हमी देत आहे / आहोत.

**आपला / आपली विश्वासू,**

**संस्थेचा शिक्का:-** **(निविदाधारकाची सही व नांव)**

(भाग्यश्री बनायत, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# Finanacial Bid "Bill of Quantity"

| | |
|---|---|
| Under inviting Authority | :- SHRI. SAIBABA SANSTAN TRUST,SHIRDI |
| Nature of work | :- Supply of Skilled & Unskilled Labourers/Personnels To All Sansthan Departments. |
| Tender No. | :- SHRI SAIBABA SANSTAN TRUST,SHIRDI |
| Bidder Name | |

| Sr.No | Description | Rate in Percentage of Only Wages to be entered by the Bidder | |
|---|---|---|---|
| | | Percentage in Figures | Percentage in Words |
| 1 | Service Charges (in Percentage) for skilled, Unskilled and other Contract employees as mentioned on page No 10 of tender document (Excluding PF, GST, Group Insurance, Ex-gratia, etc.) | | |

(निवीदा फॉर्ममधील अटी व शर्तीचे अ.नं.२५ (अ) मध्ये नमुद केलेल्या सर्व कायदेशीर आर्थिक देणी (बाबी) व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, निविदाधारकांनी सर्व्हिस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी.)

(Note- "It is therefore, decided that the Ministries / Departments may consider inclusion of the clause in the bid documents itself that "If a firm quotes 'Nil' charges /consideration, the bid shall be treated as unresponsive and will not be considerd" )

**निविदाधारकाचे नांव**

**(संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी)**

दिनांक -

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**
**E – TENDERING**
**Tender details**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Department Name :** | **SHRI. SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI / LABOUR DEPARTMENT.** | | | |
| **Tender Reference Number:** | - | | | |
| **Tender Type :** | Open Tender | | | |
| **Form of Contract :** | percentage – Rate | | | |
| **Tender category :** | Labour Supply | | | |
| **Offline Payment Instruments** | **Bank** 1) SBI 2) CBI | | | |
| **Details of Cover** | | | | |
| **Fee / Pre Qual / Technical** | As per Tender Document Page No.12 to page no. 13. | | | |
| **Finance** | As per Tender Document Page No.17. | | | |
| **EMD Fee Details** | | | | |
| **EMD Fee (INR) Rs.** | 3,00,000/- (Rs. Three Lacs only.) | | | |
| **Fee payable To** | Chief Executive Officer | | | |
| **Fee Payable at** | Shri Saibaba Sansthn Trust, Shirdi. | | | |
| Work Description | | | | |
| **Tender Value (INR) Rs.** | | | 15,000/- | |
| **Bid Validity (Days)** | **120** | Days | period of Work (Days) | 365 |
| **Prouct Category** | | | - | |
| **Contract Type** | | | Supply Skilled & Unskilled Labourer & Others | |
| Critical Dates | | | | |
| **Tender Publish** | | | Date : 2 /12/2021 Time – 11:00 AM / PM | |
| **Document Download / Sale Start** | | | Date : 2 /12/2021 Time – 11:00 AM / PM | |
| **Document Download / Sales End** | | | Date : 23/12/2021 Time – 05:00 AM / PM | |
| **Bid Submission Start** | | | Date : 2 /12/2021 Time – 11:00 AM / PM | |
| **Technical Bid & Financial Bid Submission Last Date** | | | Date 23/12/2021 Time – 05:00 AM / PM | |
| **Technical Bid Opening Date** | | | Date 27/12/2021 Time – 11:00 AM / PM | |
| **Name Of Head Of Department** | | | Babasaheb Kote | |
| **Name Of Administrative Officer For the Department** | | | Babasaheb Shinde | |

**Signature and Name**
**Head of Department**
**Labour.**

**Administrative Officer,**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.**

**Draft submitted for Approval**

(Bhagyashree Banayat, IAS)
**Chief Executive Officer,**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

Revised copy